# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६३ वे अंक ८०) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. - ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार, दि.१५ मार्च २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


## माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांची प्रकृती बिघडली; रुग्णालयात दाखल



पुणे दि.१४ (प्रतिनिधी)- भारताच्या माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांची प्रकृती बिघडली आहे. त्यांना पुण्यातल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. पुण्यातल्या भारती रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात येत आहेत. त्यांना ताप आला आहे. त्याचप्रमाणे त्यांना छातीमध्ये इनफेक्शन झाल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. त्यांना पुढील दोन ते तीन दिवस रुग्णालयात ठेवण्यात येणार आहे अशी माहिती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली आहे. एएनआयने या विषयीचं वृत्त दिलं आहे.

प्रतिभा पाटील यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना पुण्यातल्या भारती रुग्णालयात दाखल करण्यात आलं. आज सकाळीच त्यांची प्रकृती जास्त बिघडली. त्यांच्यावर उपचार सुरु आहेत आणि त्या उपचारांना योग्य प्रतिसाद देत आहेत अशीही माहिती डॉक्टरांनी दिली आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत त्यांची प्रकृती सुधारली तर त्यांना घरी सोडण्यात येईल असं डॉक्टरांनी स्पष्ट केलं आहे.

## शरद पवार यांचा फोटो वापरणार नाही, अशी लेखी हमी द्या

### सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला फटकारले

मुंबई दि.१४ (प्रतिनिधी)- निवडणूक आयोगाने अधिकृतपणे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून मान्यता दिलेल्या अजित पवार गटाला सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी अध्यक्ष शरद पवार यांची छायाचित्रे प्रचार साहित्यात का वापरत आहात? असा सवाल केला. शरद पवार यांच्या नावाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वापर करणार नाही, असे हमीपत्र दाखल करण्याचे आदेश देखील न्यायालयाने अजित पवार गटाला दिले आहेत.

तुम्ही शरद पवार यांची छायाचित्रे का वापरत आहात? तुम्हाला एवढा विश्वास असेल, तर तुम्ही तुमची छायाचित्रे वापरा, अशा शब्दात न्यायालयाने अजित पवार गटाला फटकारले आहे. "आम्हाला तुमच्याकडून अत्यंत स्पष्ट आणि बिनशर्त हमी हवी आहे की तुम्ही त्याचे नाव, फोटो इत्यादी वापरणार नाही. यात कोणतेही ओव्हरलॅप होऊ शकत नसल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. अजित पवार गटाला निवडणूक आयोगाने पक्षाचे घड्याळ हे निवडणूक चिन्ह वापरण्याची परवानगी दिली आहे. या निर्णयावरही शरद पवार गटाच्या वकिलांनी आक्षेप घेतला. पक्षात फूट पडल्यानंतर त्यांना नवीन चिन्ह वाटप करायला हवे होते. आमच्याकडे नवीन चिन्ह आहे



त्यांना मात्र, घड्याळाव्यतिरिक्त कोणतेही चिन्ह वापरू द्या. घड्याळ या चिन्हाची ओळख शरद पवार यांच्याशी अतूटपणे जोडलेली असल्याचे शरद पवार यांच्या वकीलांनी न्यायालयात सांगितले. त्यांनी व्यक्त केलेल्या चिंतेची दखल घेत न्यायपीठाने अजित पवार गटाने शरद पवार यांचा फोटो वापरु नये अशी सूचना केली. अजित पवार गटाने निवडणुकीसाठी 'घड्याळ' या चिन्हाशिवाय दुसरे चिन्ह वापरावे, जेणेकरून कोणताही गोंधळ होणार नाही, असेही न्यायालयाने तोंडी सांगितले.

तुम्ही आता एक वेगळा राजकीय पक्ष आहात. शरद पवार यांच्यासोबत राहायचे नाही, असा निर्णय तुम्ही घेतला आहे. मग त्यांचा फोटो तुम्ही प्रचारासाठी का वापरतात? असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला विचारला आहे. इतकेच नाही तर आता स्वतःची ओळख निर्माण करा. निवडणूक चिन्ह म्हणून दुसरे एखादे चिन्ह वापरा, आणि त्या नव्या विचारधारे निवडणूक लढा, अशा सूचना देखील न्यायालयाने अजित पवार गटाला केल्या आहेत.

## पेट्रोल आणि डिझेल २ रुपयांनी स्वस्त

नवी दिल्ली दि.१४ (वृत्तसंस्था)- लोकसभा निवडणुकीपूर्वी गुरुवारी देशभरात पेट्रोल आणि डिझेल दोन रुपयांनी स्वस्त झाले. आज याआधी राजस्थान सरकारने आपल्या राज्यातील डिझेल आणि पेट्रोलवरील व्हॅट २ टक्क्यांनी कमी केला आहे. जानेवारीमध्ये हिंदुस्तान टाइम्सने अधिकृत सूत्रांच्या हवाल्याने एक वृत्त प्रकाशित केले होते. त्यानुसार एका वर्षात कच्च्या तेलाच्या किमती १५ टक्क्यांनी घसरल्या आहेत. यासह, तिसऱ्या तिमाहीत तीन सरकारी तेल विपणन कंपन्यांचा निव्वळ नफा ७५,००० कोटींच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. अहवालानुसार, तेल विपणन कंपन्या सध्या पेट्रोल आणि डिझेलवर प्रति लिटर सुमारे १० रुपये कमावत आहेत, जे ते ग्राहकांना देऊ शकतात. एप्रिल २०२२ मध्ये तेल कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत शेवटची कपात केली होती.

## ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंह संधू हे निवडणूक आयोगाचे नवे आयुक्त

नवी दिल्ली दि.१४ (वृत्तसंस्था)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने आज दोन माजी सनदी अधिकाऱ्यांची निवडणूक आयोगाच्या आयुक्तपदी नेमणूक केली आहे. ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंह संधू हे आता निवडणूक आयुक्त असतील. माजी आयुक्त अरुण गोयल यांनी तडकाफडकी राजीनामा दिल्यानंतर निवडणुकीचे आयुक्तपद रिकामे होते. लोकसभा निवडणुकीला अवघे काही दिवस उरले असताना आयुक्तांनीच राजीनामा दिल्यामुळे एकच खळबळ उडाली होती. त्यानंतर आता पंतप्रधानांच्या समितीने दोन निवृत्त सनदी अधिकाऱ्यांची आयोगावर ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंह संधू यांची निवड केली आहे.

काँग्रेसचे नेते, खासदार अधीर रंजन चौधरी हे पंतप्रधानांच्या



समितीमधील एकमेव विरोधी पक्षातील नेते आहेत. चौधरी यांनी माध्यमांशी बोलत असताना याची माहिती दिली. चौधरी म्हणाले की, समितीसमोर उत्पल कुमार सिंह, प्रदीप कुमार त्रिपाठी, इंदभर पांडे, सुखबीर संधू, सुधीर कुमार आणि गंगाधर रहाटे यांची नावे होती. त्यातून आम्ही ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंह संधू यांची निवड केली.

द इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या बातमीनुसार अधीर रंजन चौधरी यांनी समितीच्या कार्यप्रणालीवरही नाराजी व्यक्त केली आहे. बैठकीच्या आधी अधिकाऱ्यांची यादी आपल्याला उपलब्ध करून द्यावी, असे त्यांनी सांगितले होते. मात्र बुधवारी आपल्याला २१२ अधिकाऱ्यांची यादी मिळाली, असा दावा चौधरी यांनी केला आहे. दुसरीकडे सरकारमधील सूत्रांच्या माहितीनुसार, चौधरी यांना पाच याद्या पाठविण्यात आल्या होत्या, ज्यामध्ये २३६ नावे होती.संपूर्ण यादीमध्ये भारत सरकारच्या ९२ निवृत्त अधिकाऱ्यांचा समावेश होता. ज्यांनी सचिव किंवा तत्सम पदावर काम केलेले आहे. त्याशिवाय सध्या सरकारी सेवेत असलेल्या ९३ सचिव किंवा त्या दर्जाच्या अधिकाऱ्यांची नावे होती. मागच्या एका वर्षात विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातून मुख्य सचिव या पदावरून निवृत्त झालेल्या १५ अधिकाऱ्यांचा समावेश होता.

## केंद्रात कष्टकरी विरोधी सरकार, शरद पवार यांचे टीकास्त्र

नाशिक दि.१४ (प्रतिनिधी)- सत्ताधाऱ्यांना शेती व शेतकऱ्याविषयी कोणतीही चिंता नसल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेसच्या पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी गुरुवारी केंद्रावर निशाणा साधताना केली. ज्यांच्याकडे सत्ता आहे त्यांना शेती व शेतकरी यांच्याविषयी कोणतीही चिंता नाही. शेतमालाला रास्त भाव मिळत नसल्यामुळे शेतकरी आत्महत्या करत आहेत. पण मोदी सरकारला त्याची कोणतीही फिकीर नाही, असे ते चांदवडच्या शेतकरी मेळाव्यात बोलताना म्हणालेत.

दरम्यान पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, कांदा निर्यात बंदीमुळे शेतकरी संकटात आला आहे, आमचे सरकार असताना शेतकऱ्यांची कर्ज माफी केली होती. देशात महागाई बेरोजगारी वाढत चालली आहे, असेही पवारांनी म्हटले आहे.

नाशिक हा महात्मा गांधी आणि नेहरुंचे स्वागत करणारा जिल्हा आहे. कांदा, द्राक्षाचे उत्पादन करताना घाम गाळतो पण सत्ता ज्यांच्या हाती त्यांना शेती आणि शेतकऱ्यांची चिंता नाही. दिल्लीत कांदा प्रश्नावर चर्चा होणार म्हणून मी थेट चांदवडमधून दिल्लीत गेलो होतो, तेव्हा किंमतीवर त्यांनी चिंता व्यक्त केली होती, असे शरद पवार म्हणाले.

## मी साहेबांचे विचार कधीच सोडले नाहीत-नीलेश लंके

### व्यासपीठावर हजेरी मात्र शरद पवार गटात प्रवेशाबाबत संभ्रम

पुणे दि.१४ (प्रतिनिधी)- अहमदनगर जिल्ह्यातील पारनेरचे आमदार नीलेश लंके यांच्या 'मी अनुभवलेला कोविड' या पुस्तकाचे प्रकाशन शरद पवार यांच्या हस्ते पुण्यात पार पडले. यावेळी दोन्ही नेत्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

अजित गटाला रामराम करत लंके शरद पवार गटात प्रवेश करतील अशी चर्चा असताना मात्र नीलेश लंके यांनी कोणतीही स्पष्ट भूमिका मांडली नाही. केवळ मी साहेबांच्याच विचाराने काम करत राहील, असे सांगत पक्षप्रवेशाच्या



चर्चांना पूर्णविराम दिला. दरम्यान, लंके हे सामाजिक कामात अग्रेसर असतात. लोकांच्या कामासाठी लागणारी सर्वोतेपरी मदत आम्ही त्यांना करत राहु, असे शरद पवार यांनी सांगितले.

पुस्तक प्रकाशनाप्रसंगी नीलेश लंके म्हणाले की, मी कधीही शरद पवार साहेबांचे विचार सोडलेले नाहीत. कालही आजही आणि उद्या देखील मी त्यांच्याच विचाराने काम करत राहील. लोकसभा निवडणुकीबाबत माझी आणि त्यांची अजिबात चर्चा देखील झालेली नाही. मी त्यांच्याच विचाराने काम करत राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. पण पक्षात प्रवेश करणार का?, या प्रश्नावर त्यांनी स्पष्ट भूमिका माडंली नाही.

नीलेश लंके म्हणाले की, देशातील महत्त्वाच्या घडामोडी व विकासाच्या गोष्टी घडल्या त्यात प्रमुख भूमिका असलेले शरद पवार साहेबांची असते. मी पवार साहेबांच्या विचारधारेवर काम करतो. माझ्या प्रचाराचा शुभारंभ पवार साहेबांनीच केला आहे. मला त्यांचो लहानपणापासून आकर्षण होते. त्यांची मला अदृश्य ताकद मला शरद पवार यांनी मदत केली.

## ममता बॅनर्जींच्या डोक्याला गंभीर दुखापत, रुग्णालयात दाखल

कोलकाता दि.१४ (वृत्तसंस्था)- पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेस पक्षाच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी दुखापतग्रस्त झाल्या आहेत. तृणमूल काँग्रेसने त्यांच्या एक्स हँडलवरून याबाबतची माहिती दिली आहे. टीएमसीने त्यांच्या एक्सवरील पोस्टमध्ये म्हटलं आहे की, 'आमच्या अध्यक्षांना गंभीर दुखापत झाली आहे. त्यांच्यासाठी प्रार्थना करा.' टीएमसीने ममता बॅनर्जी यांचा एक फोटोदेखील शेअर केला आहे. यामध्ये त्यांच्या कपाळाला गंभीर इजा झाल्याचं दिसत आहे. कपाळातून रक्तस्राव होत असून रक्ताचे ओघळ मानेपर्यंत घसरले आहेत. ममता बॅनर्जी यांना कोलकात्यामधील एसएसकेएम रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार चालू आहेत.

दुखापतीचे फोटो समोर येण्यापूर्वी ममता बॅनर्जी घरातल्या ट्रेडमिलवर चालताना पडल्याची बातमी काही वृत्तवाहिन्यांनी प्रसिद्ध केली होती. परंतु, तृणमूलने ज्या दुखापतीचं वृत्त जारी केलं आहे ती दुखापत नेमकी कशामुळे झाली आहे याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. तृणमूल काँग्रेसचे सरचिटणीस आणि ममता बॅनर्जी यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांनी ममता यांना रुग्णालयात दाखल केलं आहे.

## गद्दारांना ५० कोटींचा भाव पण शेतकऱ्यांच्या कांद्याला कोणताही भाव मिळत नाही-संजय राऊत

नाशिक दि.१४ (प्रतिनिधी)- शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी गुरुवारी कांद्याच्या मुद्यावरून केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवर सडकून टीका केली. देशात गद्दार आमदार व खासदारांना ५० कोटींचा भाव मिळतो. पण शेतकऱ्यांच्या काद्यांला कोणताही भाव मिळत नाही, असे ते म्हणालेत. राहुल गांधी आपल्या सर्वांचे नेते असल्याचेही ते यावेळी जोर देत म्हणाले.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा सध्या नाशिकमध्ये पोहोचली आहे. त्यांची गुरुवारी सकाळी चांदवडमध्ये सभा झाली. त्यात बोलताना संजय राऊत यांनी केंद्रावर तिखट हल्ला चढवला. पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा याच्या सभेसाठी भाड्याने आणले जातात. पण राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रेत लोक स्वतःहून येतात. स्वतःहून चालतात. स्वतःहून आपले विचार मांडतात. हेच आपल्या देशातील संभाव्य परिवर्तनाची नांदी आहे, असे ते म्हणाले. देशात गद्दार आमदार व खासदारांना प्रत्येकी ५० कोटींचा भाव मिळतो. पण शेतकऱ्यांच्या कांद्याला मात्र कोणताही भाव मिळत नाही, असेही राऊत यावेळी म्हणाले.

संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, राहुल गांधी आपल्या सर्वांचे नेते आहेत. ते भारत जोडो न्याय यात्रा घेऊन आता महाराष्ट्रात पोहोचलेत. मी स्वतः त्यांच्याबरोबर काश्मीरमध्ये चाललो आहे. हा नेता देश जोडण्यासाठी, माणसांची मने जोडण्यासाठी देशभर पायी चालत आहे. त्यांच्याकडे पाहून मला माजी दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांची आठवण येते. इंदिरा गांधी यांच्याविषयी इंदिरा गांधी आई है नई रोशनी लाई है अशी घोषणा दिली जात होती. तीच नवी रोशनी व नवा प्रकाश घेऊन राहुल गांधी या देशात आणि या महाराष्ट्रात आलेत. आपण त्यांचे स्वागत केले पाहिजे, असे ते म्हणाले.

## सुधीर मुनगंटीवार यांना बळीचा बकरा केला; विजय वडेट्टीवार यांची टीका

चंद्रपूर दि.१४ (प्रतिनिधी)- माझे तिकीट मीच कापेल, असे म्हणत सुधीर मुनगंटीवार यांनी वल्गना केली होती. मात्र, आता त्यांची दिल्लीत जाणारी वाट जनता कापेल, अशा शब्दात विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी सुधीर मुनगंटीवार यांच्यावर निशाणा साधला आहे. बिचाऱ्यांना इच्छा नसताना जबरदस्तीने त्यांच्या गळ्यात ही वरमाला घातली असल्याचे चित्र त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत असल्याचेही विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. भाजपच्या लोकसभेच्या २० उमेदवारांची यादी काल जाहीर झाली. या यादीत चंद्रपूर लोकसभा मतदार संघातून सुधीर मुनगंटीवार यांना उमदवारी देण्यात आली आहे. मात्र, आपण लोकसभा लढवण्यास इच्छुक नसून आपल्याला राज्यातच राहायचे असल्याचे मुनगंटीवार यांनी म्हटले होते. मात्र, तरी देखील त्यांचे नाव घोषीत झाल्यामुळे वडेट्टीवार यांनी त्यांच्यावर वार केला आहे.

नव्या संसद भवनाला चंद्रपूर मधून पाठवलेल्या लाकडाचा दरवाजा आहे. या दरवाज्यातून चंद्रपूरची जनता मला नव्या संसद भवन मध्ये पाठवेल, अशा शब्दात सुधीर मुनगंटीवार यांनी उमेदवारीवर प्रतिक्रिया दिली होती. यावरून देखील वडेट्टीवावर यांनी वार केला आहे. ते लाकूड चंद्रपूर जिल्ह्यातील आहे. ते भाजपच्या प्रांगणातले नाही. त्यामुळे त्या दरवाजातून कोणी आत जायचे, याचा निर्णय चंद्रपूरची जनता घेणार असल्याचे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. चंद्रपूर जिल्हा हा काँग्रेसचा बालेकिल्ला आहे. या जिल्ह्यामध्ये काँग्रेसचे सर्वाधिक आमदार आहेत. त्यामुळे येथून काँग्रेसचा उमेदवार लोकसभेवर निवडून येईल, असे म्हणत विजय वडेट्टीवार यांनी भारतीय जनता पक्षावर निशाणा साधला.

## ...तर महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक होणार नाही- उद्धव ठाकरे

रत्नागिरी दि.१४ (प्रतिनिधी)- शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रभर दौरे करत आहेत. ठाकरे यांनी जनसंवाद कार्यक्रम हाती घेतला असून या कार्यक्रमांतर्गत त्यांनी आज दापोलीतल्या नागरिकांशी संवाद साधला. यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले, भाजपा खासदार अनंतकुमार हेगडे यांनी काही दिवसांपूर्वी स्पष्ट सांगितलं आहे की, भाजपाला देशाची राज्यघटना बदलायची आहे. त्यामुळेच त्यांना ४०० पार जायचं आहे भाजपावाले एकदा का ४०० पार गेले की मग ते एक राष्ट्र एक निवडणूक घेतील. देशभरात त्यांचा मनमानी कारभार सुरू होईल.

उद्धव ठाकरे म्हणाले, आत्ता देशात महापालिका निवडणुका होत नाहीयेत. काश्मीरमध्ये चार-पाच वर्षांपासून विधानसभेची निवडणूक झालेली नाही. ही लोकसभा (२०२४) त्यांच्या घशात गेली तर महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक होईल की नाही ते सागता येत नाही. ही एकच निवडणूक झाली की नरेंद्र मोदी दिल्लीत अध्यक्ष म्हणून बसतील. देशात अध्यक्षीय पद्धत सुरू करतील. मग ते सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांमध्ये त्यांच्या मर्जीतल्या (न्यायपालिकेतल्या) लोकांना न्यायमूर्ती म्हणून नेमतील. रशियात पुतिनही तेच करतात. तसंच आपल्या देशातही पंतप्रधान न्यायमूर्तींची नेमणूक करण्यास सुरुवात करतील. तसेच देशात एकच निवडणूक घेतली जाईल असा हल्लाबोल त्यांनी केला.

## नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या निलंबन आदेशाला स्थगिती

मुंबई दि.१४ (प्रतिनिधी)- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांना न्यायालयाने मोठा दिलास दिला आहे. चौधरी यांच्या निलंबन रद्द करण्याच्या आदेशाला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्थगिती दिली आहे. या प्रकरणी न्यायमूर्ती अनिल किल्लोर आणि न्यायमूर्ती मुकुलिका जवळकर यांच्या खंडपीठाने आज गुरुवारी हा महत्वपूर्ण निर्णय दिला आहे

राज्यपाल रमेश बैस यांच्या कार्यालयात कुलगुरू डॉ. चौधरी यांच्याविरोधातील वेगवेगळ्या तक्रारींच्या अनुषंगाने सुनावणी घेण्यात आली होती. त्यानंतर २१ फेब्रुवारीला आदेश जारी करून डॉ. चौधरी यांना आपल्या पदावरून बडतर्फ करण्याचे आदेश राज्यपालांनी दिले होते. या निलंबनाच्या कारवाई विरोधात चौधरी यांच्याकडून न्यायालयात आव्हान दिले असता न्यायालयाने त्यांच्या बाजूने निर्णय देत डॉ. चौधरी यांना मोठा दिलासा दिला आहे.

## ...तर नरेंद्र मोदींना पळून जावे लागेल; राहुल गांधींची टीका

नाशिक दि.१४ (प्रतिनिधी)- काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी व त्यांच्या नेतृत्वातील सरकारवर जातनिहाय जनगणनेच्या मुद्यावरून तिखट हल्ला चढवला. देशातील आदिवासी, दलित, मागासवर्गीयांनी जातगणनेची मागणी केली, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ती करावी लागेल किंवा पळून जावे लागेल, असे ते म्हणाले. दरम्यान, राहुल गांधी यांचा गुरुवारी नाशिकमध्ये रोड झाला. यावेळी काही कार्यकर्त्यांनी त्यांना जेसीबीच्या मदतीने हार घालण्याचा प्रयत्न केला. पण राहुल यांच्या अंगरक्षकांनी त्यांना तसे करण्यापासून रोखले. यामुळे त्यांचा चांगलाच हिरमोड झाला.

राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा सध्या नाशिकमध्ये आहे. राहुल गांधी यांनी गुरुवारी दुपारी नाशिकमध्ये रोड शो काढला. दुपारी ३ च्या सुमारास हा रोड शो द्वारका चौकातून सुरू झाला. त्यानंतर हा रोड शो शहरातील सारडा सर्कल परिसरात आला असता काँग्रेसच्या काही पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राहुल यांना जेसीबीच्या मदतीने हार घालण्याचा प्रयत्न केला. पण राहुल यांच्या सुरक्षा रक्षकांनी त्यांना मज्जाव केला. ते



एवढ्यावर थांबले नाही. त्यांनी जेसीबीवरील हार तोडून टाकला. यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांचा चांगलाच हिरमोड झाला. या घटनेनंतर राहुल यांचा ताफा शालिमार परिसराकडे रवाना झाला. तिथे राहुल गांधींची जाहीर सभा झाली. त्यात त्यांनी जीएसटी, शेतकरी व आदिवासींची समस्या, जातनिहाय जनगणना, महागाई, बेरोजगारी, पेपरलिक आदी मुद्यांवरून केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवर टीकेची झोड उठवली. कोणत्याही क्षेत्रात मागास वर्गाचे योग्य प्रतिनिधित्व नाही. या वर्गाच्या लोकसंख्येचा खरा आकडा कुणीही सांगू शकत नाही. त्यांचा आकडा ५० टक्क्यांच्या आसपास असल्याचा दावा केला जातो. पण प्रत्यक्षात आदिवासी, दलित, मागासवर्ग यांचा आकडा ९० टक्क्यांच्या आसपास आहे. या वर्गाने आपली ताकद ओळखली पाहिजे. त्यांनी जातगणनेची मागणी केली तर नरेंद्र मोदींना एकतर जातगणना करावी लागेल किंवा पळून जावे लागेल, असे राहुल गांधी म्हणाले.

## देशातील शेतकरी अस्वस्थ-जयंत पाटील

नाशिक दि.१४ (प्रतिनिधी)- मोदी सरकारने सर्वत्र मोदी गॅरंटी सांगत आपली विकास कामे दाखवण्यास सुरूवात केली आहे. मात्र त्यांची गॅरंटी आता चायनासारखी आहे. चले तो चांद तक नही तो शाम तक अशी स्थिती आहे. सामान्य माणसाने जागरुक राहिल पाहिजे. दिसत तसे नसते, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष गटाचे नेते जयंत पाटील यांनी मोदींवर निशाणा साधला आहे.

जयंत पाटील म्हणाले की, देशातील शेतकरी अस्वस्थ आहे. शेतकरी दिल्लीच्या सीमेवर जाऊन बसलेत. आमच्या मालाला आधारभूत किमत द्या अशी मागणी शेतकरी करत आहेत. कांद्याला भाव नाही. निर्यातबंदी उठविण्याची दानत या सरकारमध्ये नाही. सोयाबीन, कापूस यांना भाव मागणारे आता गप्प आहेत. असे त्यांनी नाशिकच्या चांदवड येथील शेतकरी मेळाव्यासाठी आले असताना भाजपवर टीका केली आहे.

# जागो ग्राहक जागो

‘ग्राहक हा राजा असतो’, ‘ग्राहक हा देव असतो’ हे वाक्य दुकानदार, सेवा देणाऱ्या विविध कंपन्या मोठमोठया आवाजात ऐकवत असतात. ग्राहकाला देव व राजा मानताना दुसरीकडे त्याची फसवणूक करायची असे प्रकार सर्रास घडतात.

आपण एकटेच आहोत, तक्रार करून काय होणार अशी भूमिका ठेवून ग्राहकही फसवणूक चुपचाप सहन करतात. मात्र, ग्राहकांनी थोडी जागरूकता दाखवल्यास आणि लढा दिल्यास त्यांच्यावरचा अन्याय दूर करता येतो, हे मुंबई ग्राहक पंचायतीने आपल्या वाटचालीत दाखवून दिले आहे. जागतिक ग्राहक दिनानिमित्त ग्राहक हिताय, ग्राहक सुखाय संस्थेची ऐतिहासिक कामगिरी..

१५ मार्च हा जागतिक ग्राहक हक्क दिन साजरा केला जातो. Word Consumer Rights Day त्याचे छोटेखानी रूप हउफऊ म्हणून ग्राहक जगतात परिचित आहे. आता हीच तारीख कशी काय निवडली याची थोडी पार्श्वभूमी अशी, १९६० मध्ये अमेरिकन निवडणूक प्रचारात जॉन एफ. केनेडी यांनी अमेरिकन जनतेला आश्वासन दिले की, ‘ग्राहक चळवळीला आपण पाठिंबा देऊ’ आता हे आश्वासन देण्याची वेळ आली, ती राल्फ नाडर या वकील महाशयांनी आपला व्यवसाय करताना येणारे अनुभव डोळसपणे अभ्यासले, म्हणून!

मोटार अपघातांचे दावे मोठया प्रमाणावर दाखल होत आहेत. व्यक्ती जीव गमावून बसत आहेत किंवा शारीरिक अपंगत्व, इजा यांना बळी पडत आहेत. मात्र या अपघातांना त्या व्यक्तीनाच जबाबदार धरले जाते. या अपघाताच्या दाव्यांच्या अभ्यास करताना त्यांच्या ध्यानात आले की खरं कारण आहे ‘असुरक्षित मोटारी’ म्हणजेच मोटारींचे ‘ग्राहक’ त्यांची कोणतीही चूक नसताना अपघातग्रस्त होत आहेत.

मोटारी सुरक्षित हव्यात. उत्पादन करणाऱ्या प्रक्रियेमध्येच त्यांची सुरक्षितता अंतर्भूत असली पाहिजे यासाठी राल्फ नाडर यांनी जीवाचे रान केले. अमेरिकेच्या अध्यक्षपदी निवडून आल्यानंतर जॉन एफ केनेडी यांनी आश्वासनाची पूर्तता केली. त्यांनी १९६२ मध्ये ‘ग्राहक हक्कांची सनद’ मंजूर करून घेतली. १५ मार्च १९६२ रोजी अमेरिकन कॉंग्रेसपुढे त्यांनी भाषण केले. त्यानंतर अमेरिकन नागरिकांना चार मूलभूत ग्राहक हक्क प्रथमच मिळाले.

१) सुरक्षिततेचा हक्क
२) माहिती मिळविण्याचा हक्क
३) वस्तू सेवा निवडीचा हक्क
४) मत ऐकले जाण्याचा हक्क

केनेडी यांनी अमेरिकी कॉंग्रेसमध्ये ग्राहकांच्या हक्कासंबंधी केलेल्या भाषणाची तारीख होती १५ मार्च त्यामुळे हा दिवस १९८३ पासून जगात ग्राहक हक्क दिन म्हणून पाळला जातो. त्यानिमित्ताने त्या त्या देशातील ग्राहक संस्था एखादी मोहीम आखतात ती वर्षभरासाठी राबवतात. ग्राहक शिक्षण व संरक्षणाच्या प्रयत्नातून सर्वसामान्य ग्राहकांचे सक्षमीकरण करतात.

आजच्या बाजारचलित व जाहिरात प्रेरित खरेदीच्या वातावरणात हे काम अधिक महत्त्वाचे आणि गुंतागुंतीचे होत चालले आहे. याची जाणीव मुंबई ग्राहक पंचायतीला आहे. ती सामान्य कार्यकर्त्यांपर्यंत झिरपेल याबाबत संस्था जागरूक आहे. १९७४-७५ च्या काळात सर्वसामान्य मध्यमवर्गीय कुटुंबांना अन्न, धान्ये, खाद्यतेल, गॅस, केरोसिन या सारख्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी मोठा वेळ द्यावा लागत होता.

धावपळ करत रांगा लावणे, भेसळयुक्त पदार्थ खरेदी करायला लागून ते निवडण्यात पाखडण्यात, धुण्यात, वाळवण्यात ताकद खर्च करावी लागत होती. त्या काळातील परिस्थिती आजच्या काळात खरी वाटणार नाही.

मात्र, १९७५च्या गुढीपाडव्याला श्रीफळाच्या सामुदायिक खरेदी व वितरणातून संस्थेच्या कार्याची छोटी सुरुवात झाली. ग्राहकांना एकत्रित करण्यासाठी त्यांच्या दैनंदिन जगण्याशी चिकटलेल्या समस्येला हात घालण्यात आला.

त्यामागे जी दूरदृष्टी होती. पायाभरणीचे कौशल्य होते ते कै. सुधीर फडके, मा. बिंदुमाधव जोशी, कै. मधुकरराव मंत्री यांचे. मधुकररावांनी आपल्या नगरसेवक पदाचा राजीनामा देऊन संस्थेचे रोप मूळ धरेल असे कार्य केले.

तन-मन-धनाने ते रोप शिंपून त्याला संयम, वितरणात समानता, स्वदेशनिष्ठा आणि श्रमप्रतिष्ठा या चतु:सूत्रीचे भक्कम कुंपण घातले. स्वयंसेवेचा वसा स्वत: घालून आदर्श उभा केला. ग्राहकांच्या एकत्रित सामर्थ्याचे बळ ग्राहकांनाच माहीत नव्हते, त्याचे भान त्यांनी आणून दिले. विश्वास आणि पारदर्शक व्यवहार या दोन दीपस्तंभाच्या उजेडात मासिक अन्न, धान्य, तेल, तुपाच्या गरजा २० टक्केपर्यंत कमी खर्चांत भागविणारी आणि दर्जाला प्राधान्य देणारी वितरण व्यवस्था ‘नाथाघरची उलटी खूण’ म्हणावी अशीच!

माल कसा ते पाहायचे नाही, त्याचे पैसे संस्थेकडे आधीच चेकने जमा करायचे, सगळ्या संघ सदस्यांचा प्रचंड माल एका ठिकाणी उतरवून घ्यायचा. त्यातही कापडी पिशव्या धुवून द्यायच्या, एवढे सगळे (उपद्व्याप) करणारी जवळ जवळ ३४ हजार कुटुंबे आज संस्थेशी जोडलेली आहेत.

स्वयंसेवी वृत्तीने काम करणारे संघप्रमुख आणि शिक्षण, संरक्षण, वितरण यामध्ये सहभाग देणारे स्तनपान मोहिमेपासून ‘शुद्ध दूध आपला अधिकार’ या मोहिमेपर्यंत सर्व कामांमध्ये झोकून देणारे हजारो कार्यकर्ते हे संस्थेचे बळ आहे. ही अचंबित करणारी वितरण व्यवस्था आणि त्यामधील महिलांचा उत्साही स्वयंसेवी सहभाग, जगभरातील ग्राहक संस्था आणि यूनोच्या विविध आयोगांना आज माहीत आहे.

नॉर्वेच्या ‘मिशन पॉसिबल’ या अंतर्गत १९९९ मध्येच Innovative Development Model म्हणून आपल्या मुंबई ग्राहक पंचायतीच्या या वितरण मॉडेलचा गौरव झाला. हे शक्य झाले, तेही संस्थेच्या हितचिंतक व दूरदृष्टीच्या कार्यकर्त्यांमुळे, कन्झ्युमर्स इंटरनॅशनल (सी.आय.) या जागतिक पातळीवरील संस्थेचे सदस्यत्व घेण्याचा निर्णय मुंबई ग्राहक पंचायतीने घेतला व अमलात आणला. त्यामुळे आपले काम त्या जागतिक व्यासपीठावर मांडण्याची संधी संस्थेला मिळाली. जगभरात ग्राहकांसाठी काम करणाऱ्या संस्था या सी.आय. या संस्थेचे सदस्य असतात. ग्राहकांसाठी काम करणाऱ्या जगभरातील संस्था.

मात्र, गंमत अशी की, झोकून देऊन काम करणाऱ्या आमच्या स्वयंसेवक कार्यकर्त्यांना ‘आपण काहीतरी जगावेगळे, खास (युनिक) एकमेवाद्वितीय काम उभे करतो आहोत’ याची जाणीवच नव्हती, पण हा जगन्नाथाचा रथ ज्यांनी लांबून पाहिला त्या जगातल्या संस्थांना त्यात लपलेल्या विविध क्षमतांची जाणीव झाली. म्हणूनच त्यांनी ज्यावेळी १९९९ मध्ये Uncommon Sustainable Development अंतर्गत संस्थेच्या वितरण व्यवस्थेचा गौरवपूर्ण उल्लेख केला, तेव्हा संस्थेला आपल्या कार्याची जणू नवी ओळख पटली.

झिम्बाब्वेमधून तिथल्या ग्राहक संस्थेची कार्यकर्ती मुंबईला आली २००० मध्ये. तिने या वितरण व्यवस्थेचा एक आठवडा चक्क ‘अभ्यास’ केला. गोदाम, पॅकिंग सेंटर इ. ठिकाणी भेटी देऊन प्रत्यक्ष अनुभव घेतला. कारण आपल्या वितरण व्यवस्थेत मागणी इतकीच खरेदी असते. त्यामुळे खेळते भांडवल, स्टॉक इ. ची गरज जणू काही नसतेच. त्यामुळे मालाची सामुदायिक मागणी ते संघपोच सामानासाठी ट्रक-टेम्पोची सोय या सगळ्याचे वेळापत्रक सिस्टीम आहे, ती समजून ती मायदेशी परतली. आता त्या विकसनशील देशातही वितरणाचे हे मॉडेल यशस्वीपणे राबविले जाते. आहे. (replicating mgp model)

ह्या प्रकारे ग्राहकांची एकजूट वितरणाद्वारे होत असतानाच विविध ग्राहक गटांसाठी संरक्षण कसे वाढविता येईल, १९८६ चा भारतीय ग्राहक संरक्षण कायदा अधिकाधिक व्यापक कसा करता येईल, यावर सतत अभ्यास चालू होता व आहे. त्यामुळे एकाच समस्येने ग्रासलेल्या शेकडो, हजारो ग्राहकांना सुलभपणे न्याय मिळण्याचे मार्ग खुले होण्यास, संस्थेच्या वतीने चालविण्यात आलेले काही न्यायालयीन खटले कारणीभूत ठरले. संस्थेचे नाव त्या परिघातही चमकू लागले. गेल्या २० वर्षापासून सुरू असलेला हा सिलसिला आजही ‘ग्राहक संरक्षण कायद्यातील प्रस्तावित सुधारणा’चा अभ्यास करून सुरूच ठेवलेला आहे.

सुरुवातीच्या काळातलं तत्त्व ‘प्रसिद्धी मागे धावू नका, काम करीत राहा. तुमचे काम पाहून प्रसिद्धी तुमच्यामागे धावत येईल.’ खरोखरच अनुभवाला येत आहे. फिजी या देशातील ‘ग्राहक संरक्षण कायदा’ बनत असताना त्याला आकार देण्यासाठी संस्थेचे कार्याध्यक्ष अॅड. शिरीष देशपांडे यांना निमंत्रित केले होते. त्यांनी संस्थेच्या माजी कार्याध्यक्ष व विश्वस्त मा. ललिता कुलकर्णी, (कै.) सुधा पाटणकर व अॅड. अर्चना सबनीस यांची एक टीमच बनवली. फिजीच्या आज अस्तित्वात असलेल्या ‘ग्राहक संरक्षण कायद्यामध्ये’ मुंबई ग्राहक पंचायतीचे योगदान ही अभिमान वाटावी अशीच घटना म्हणावी लागेल.

२०११ मध्ये मुंबई ग्राहक पंचायतीची पताका जागतिक ग्राहक जगतात डौलाने फडकली. सी.आय.च्या संचालक मंडळावर (याला एक्झिक्युटिव्ह कौन्सिल असे ही म्हणतात) ‘मुंबई ग्राहक पंचायत’ निवडून आली.

संस्थेचे प्रतिनिधी कार्याध्यक्ष अॅड. शिरीष देशपांडे यांचे ग्राहक हिताविषयीचे सजग, अभ्यासू आणि चळवळीला मानवी चेहरा देणारे योगदान हे जागतिक पातळीवरील समस्यांना ही भीडू लागले. त्यामुळे युनायटेड नेशन्स गाईड लाईन्स फॉर कन्झ्युमर प्रोटेक्शन- १९८५ (UNGCP)यात सुधारणा/ बदल करणे, त्यांचा विस्तार करणे, त्या मार्गदर्शक तत्त्वांचे रूपांतर आयोगामध्ये (कमिशन- UNCOCP)) होण्यासाठी समर्थपणे, अभ्यासपूर्ण युक्तिवाद करणे, मुद्दे मांडणे, या कामाला संस्थेचे कार्यकर्ते भिडले. जागतिक पातळीवर, UNCTAD च्या व्यासपीठावर संस्थेचे प्रतिनिधित्व करायला मिळण्यासाठी जी वेगळी पात्रता प्राप्त करावी लागते, त्यासाठी ही मंडळी रात्रंदिवस झटली. १९८५च्या UNGCP मुळे अनेक देशात ग्राहक चळवळींना बळ मिळाले, कायदे बनवले गेले, पण अखेर ही ‘मार्गदर्शक तत्त्वे’ आहेत. त्यामुळे ती बंधनकारक नाहीत. आज जागतिक, टेक्नेसॅव्ही, ई-कॉमर्सच्या बाजारपेठेत ग्राहकांचे संरक्षण होण्यासाठी मुळात या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नवीन मुद्दे अंतर्भूत करायला हवेत.

जसे पर्यटन, टाईम शेअर, ई-कॉमर्स, अर्थविषयक उत्पादनांच्या ग्राहकांचे संरक्षण, याविषयी मुंबई ग्राहक पंचायतीच्या प्रतिनिधी शुभदा चौकर (२०१३) आणि वर्षा राऊत (२०१५) यांनी जीनिव्हाच्या ‘पॅलेस द नेशन’ मधील सभागृहात अभ्यासपूर्ण प्रतिपादन प्रभावीपणे केले.

तेथे अॅड. शिरीष देशपांडे यांनी सी.आय.च्या संचालक मंडळाचे प्रतिनिधी म्हणून सी.आय.ची बाजू मांडली. ही सर्व सादरीकरणे इतकी प्रभावी झाली की अमेरिका व जपान वगळता, अन्य सर्व राष्ट्रांनी मुंबई ग्राहक पंचायतीतर्फे करण्यात आलेल्या सूचनांना मान्यता दिली.

आंतरराष्ट्रीय पातळीवर संस्थेने उमटवलेला हा ठसा थक्क करणारा आहे. मात्र त्याबरोबर आपल्या क्षमतांची जाणीव करून देणारा आणि जबाबदारी वाढविणाराही आहे. दरमहा तांदूळ, साखर, गहू, डाळी, तेले, साबण इ. ९० च्या वर वस्तूंच्या दर्जाची खात्री करून, मग योग्य भावात ३३ हजार कुटुंबांसाठीची खरेदी करणारी, संस्थेची स्वयंसेवी खरेदी समिती ते जीनिव्हामध्ये सादरीकरण करणारी अभ्यासू टीम असा विस्तीर्ण पसारा संस्थेचा पसरला आहे.

तक्रार मार्गदर्शन, ग्राहक शिक्षण, पंचायतपेठा आदी अनेक उपक्रम वाढताहेत. पालघरपासून रत्नागिरीपर्यंत पसरलेली आमची सदस्य मंडळी त्या त्या परिसरात आपले योगदान देत आहेत. गेल्या दोन वर्षापासून ही संस्था पुण्यातही वाढत आहे.

ग्राहकांच्या नव्या पिढया या कामात सामील होत आहेत. गेल्या अनेक वर्षामधल्या विविध उपलब्धींविषयी विस्ताराने सांगायचे, तर खूप आहे. आज जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त मुंबई ग्राहक पंचायतीच्या जागतिक पातळीवरील योगदानाविषयी आपल्याशी संवाद साधता आला त्याचे समाधान आहे. या दिनाच्या व संस्थेच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने ग्राहक जगताला खूप खूप शुभेच्छा!

# ‘कांशी तेरी नेक कमाई, किस किसने बेच के खाई’

**बहुजनांच्या म्हणजे मागासवर्गीय, ओबीसी, आदिवासी आणि अल्पसंख्याक समाजाचे राष्ट्रीय पातळीवर समर्थपणे नेतृत्व करेल अशी एक ही व्यक्ती आज राजकीय पातळीवर नाही. हा सर्व बहुजन समाज विविध पक्षात स्वार्थासाठी विभागला आहे, कोणती ही एक ठोस विचारधारा न मानणारा हा बहुजन समाज आज पुन्हा पुन्हा विखुरलल्या जात आहे. आणि त्यांच्यात प्रचंड असंतोष आहे. राज्यात व केंद्रात त्या त्या समाजांचे प्रतिनिधित्व आहे, पण ते स्वाभिमानी नाही, लाचार, गुलामगिरी पत्कारलेल वैचारिक दृष्ट्या अपंगत्व असलेलं आहे. मान्यवर कांशीरामजी यांनी ज्या विश्वासाने बहन मायावती यांच्या कडे बहुजन समाज पक्षाचे नेतृत्व दिले होते. ते कुठे तरी कमी पडले. आज उत्तर प्रदेशाच्या बाहेरच्या राज्यात कांशीरामजी सारखे पक्ष संघटन उभे करण्यास कमी पडते. त्याची सामिक्षा मान्यवर कांशीरामजी यांच्या ९० व्या जयंतीनिमित्त झाली पाहिजे. म्हणून हा लेख प्रपंच.**

**आज** भारतात बहुसंख्य बहुजन समाजातील सर्व जाती मध्ये राजकीय स्पर्धा निर्माण झाली. ते निर्माण करणारे मान्यवर कांशीरामजी यांनी मागासवर्गीय समाजात प्रबोधन केले म्हणून झाली. त्यासाठी ते भारताच्या काश्मीर ते कन्याकुमारी पर्यत गावागावात फिरले. असा माणूस ज्याने ४००० हजार किलोमीटर सायकल चालवुन फुले, शाहू, आंबेडकरांचे विचारांचे प्रबोधन करून आंदोलन उभे करून यशस्वी राजकारण केले.व देशातल्या विमान आणि हेलिकॉप्टर मध्ये फिरून राजकारण करणाऱ्या नेत्यांना निवडणुकाद्वारे आपली ओळख निर्माण करून दाखविली, बहुजन समाजात आत्मविश्वास निर्माण केला. त्यामुळेच एक जोश पूर्ण घोषणा तयार झाली होती. ‘कांशी तेरी नेक कमाई तुने सोती कोम जगाई’ मात्र आज या घोषणेचा अर्थ आणि सत्यपरिस्थिती पूर्ण बदलली आहे. बहुजन समाजातील जाणकार,राजकारणी काय म्हणतात ‘कांशी तेरी नेक कमाई, किस किसने बेच के खाई’ मान्यवर कांशीराम यांनी खूप मेहनत करून मागासवर्गीय समाजाला बहुजन समाज म्हणुन संघटित केले त्यासाठी त्यांनी क्रांतिकारी घोषणा दिल्या.त्यामुळे समाजात प्रचंड प्रबोधन झाल्यामुळे परिवर्तन झाले. त्या त्या घोषणा सत्ता मिळविण्याच्या स्पर्धेत अर्थपूर्ण बदलल्या त्या घोषणा मुळे बहुजन समाजात जनजागृती झाली. त्याच घोषणांचा आज प्रत्येक मतदारसंघात बहुजन समाज म्हणजे आपला बिकाऊ गुलाम मतदार आहे.असा समज वरिष्ठ पक्ष नेतृत्वाला झाला आहे. जिसकी सांख्य



भारी उतनी उसकी भागेदारी म्हणायचे आणि ज्याचा पैसे भारी त्याला उमेदवारी देऊन मतदार संख्येच्या हिशेबाने रोख रुपये घ्याचे, हा धंदा झाल्यामुळे बहुजन समाज पक्ष विचारधारे पासुन दूर गेला आहे.

जाती तोडो, समाज जोडो, सर्व जातीचा वैचारिक भाईचारा संपला, आता स्वार्थासाठी युती आघाडी होत आहे. बापाची पॉपर्टी समजून ज्यांनी २५ वर्ष राज्याचे अध्यक्ष पद भोगले त्याची सत्य परिस्थिति अशी आहे की तो समाजाला तोंड दाखव्याच्या लायकीचा राहील नाही. त्याने जे पेरले तेच उगवले आहे.राज्यातील एक कायदे तज्ञ देशातील तीन चार राज्याचे प्रभारी राहिले होते. देशातील प्रत्येक निवडणुकीतील मतदार संघातील आकडेवारी आणि टक्केवारी त्यांच्या तोंड पाठ होती. त्यामुळेच देशातील विचारवंत कायदे तज्ञ नेते म्हणून ते ओळखले जात होते. बसपा राष्ट्रीय पक्षात त्यांची कोणत्या पदावर कायदेशीर नोंदणी होती. हे त्यांना समजले तेव्हा त्यांनी स्वताचा राष्ट्रीय पक्ष काढला आणि २०१९ ला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे वरळी विधानसभा उमेदवार म्हणून निवडणूक लढवली. हा इतिहास लिहला गेला आहे. म्हणूनच कांशी तेरी नेक कमाई, तुने सोती कोम जगाई!.हा संदेश देशात क्रांतीकरून गेला. आज या घोषणेचा अर्थ आणि सत्यपरिस्थिती पूर्ण बदलली आहे. बहुजन समाजातील जाणकार, राजकारणी काय म्हणतात ‘कांशी तेरी नेक कमाई, किस किसने बेच के खाई’ झाला आहे.असो शेवटी इतिहास हा इतिहास असतो आणि तो लिहला जातो.

मान्यवर कांशीराम यांचा जन्म १५ मार्च १९३४ ला पंजाब राज्यातील मुक्काम पोस्ट खवासपूर जिल्हा रोपड येथे एका मागासवर्गीय रविदासीय म्हणजेच शीख चर्मकार समाजात झाला होता. त्यांच्या आईचे नांव बिशन कौर आणि वडिलांचे नांव हरिसिंग होते. रोपड येथील शासकीय महाविद्यालयात बी एस्सी पर्यत शिक्षण झाले होते. उच्च ऊर्जा पदार्थ संशोधन प्रयोग शाळा पुणे येथे नोकरीला लागले होते. १९६५ ला केंद्र सरकारने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १४ एप्रिल जन्म दिनाची सार्वजनिक सुट्टी रद्द करण्याचा आदेश काढला होता. त्या आदेशाच्या विरोधात भारत सरकारच्या सेवेत असणाऱ्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांनी आंदोलन सुरू केले होते.त्या आंदोलनात मान्यवर कांशीरामजी उच्च पदस्थ अधिकारी असून सुद्धा सहभागी झाले. तोच त्यांच्या जीवनातील क्रांतिकारी बदल होता. तिथूनच त्यांचा संघर्ष सुरू झाला. त्यांनी १९७८ साली त्यांनी ऑल इंडिया बॅकवर्ड अँड मायनॉरीटीज कम्युनिटीज एम्प्लेयईज फेडरेशन (बामसेफ) All India Backward and Minority Communities Employees Federation (BAMCEF) स्थापना केली होती. ६ डिसेंबर १९८१ साली त्यांनी दलित शोषित समाज संघर्ष समिती (डी एस-४) ची स्थापना केली. तेव्हा त्यांचा एक लोकप्रिय नारा होता. ‘ब्राम्हण, ठाकूर, बनिया चोर है बाकी सब डीएस फोर है.’ १४ एप्रिल १९८४ बहुजन समाज पक्षाची स्थापना झाली. हर समस्या कि चाबी सत्ता होती है, म्हणनूच ‘जिसकी जितनी संख्या भारी उसकी उतनी हिस्सेदारी’ व्होट हमारा राज तुमारा नही चलेगा, नही चलेगा!.न बिकणे वाला समाज बनविण्यासाठी त्यांनी चार हजार किलोमीटर सायकलवरून यात्रा कडून प्रबोधन केले. एक नोट एक व्होट, प्रयोग यशस्वी करून दाखविला. होऊ शकत नाही, म्हणणाऱ्यांना होऊ शकते हे करून दाखविले. सर्व समस्या ची ८५ बनाम १५ टक्के ची चाबी कुठे हरवली आहे. ती शोधण्याची इच्छाशक्ती आज राजकीय नेतृत्व करणाऱ्या मायावती यांच्यात राहिली नाही.या सर्व घटनाची प्रामाणिकपणे आत्मचिंतन परीक्षण किंवा समीक्षा करण्याची तयारी नेत्यांची नाही. म्हणून बहुजन समाज पहिल्या पेक्षा आता जास्त संघटनेत विभागला जात आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुणे करारावर प्रतिकीर्या देताना सांगितले होते कि संयुक्त मतदार संघ म्हणजे एक गलिच्छ उपनगर ज्या नगराचा उमेदवार ठरविण्याचा अधिकार उच्च वर्णीय लोकांना आहे. आणि त्याचा समाजाचा सत्यानाश करण्यासाठी वापर करने म्हणजेच मान्यवर कांशीरामजीच्या शब्दात चमचा. (आजचे राष्ट्रपती, लोकसभा सभापती, राज्यपाल ) चमचा हा घराघरात वापरल्या जाणारे हत्यार आहे. जे स्वत कोणतेही काम करू शकत नाही. पुणे करारा नंतर राजकारण्यांनी असेच चमचे मागासवर्गीय, असंघटित, कष्टकरी शोषित पीडित, आदिवाशी आणि अल्पसंख्याक समाजात निर्माण केले. चमचाचा वापर नेहमी आपल्या फायद्या साठीच होतो. त्यामुळे तो कोणाचे नुकसान स्वतः करीत नाही कोणाच्या सांगण्या वरून करतो. मान्यवर कांशीराम यांच्या बसपाची मबहुजन हिताय बहुजन सुखाय घोषणा’ जेव्हा मायावतीने ‘सर्वजण हिताय, सर्वजण सुखाय’ केली तेव्हा सत्ता आल्यावर चमचा आणि हत्यार कसे वापल्या जाते हे दिसून आले. बहन मायावती सत्ता चालविण्यास, समाजाच्या आणि राज्याच्या हिताचे निर्णय घेण्यास समर्थ होत्या. अनेक विद्यालयाला महाविद्यालयाला महापुरुषाच्या नांवे देऊन वैचारिक समाज क्रांती झाली पाहिजे होती. जिल्ह्याचे नांव सर्व महापुरुष संत महामाताच्या नांवे केले. त्यामुळे मागासवर्गीय समाजात विशेष चमार समाजात मोठा राजकीय दुष्टिने बदल अपेक्षित होता. पण काय बदल झाला?. हे कांशीरामजीचे तत्वज्ञान मायावतीने केवळ सत्ता मिळवण्यासाठी मातीमोल करून ठेवले असे बोलले जाते. हे आता सर्वच कॅडर बेस, बामसेफचे उच्चाशिक्षित अधिकारी खाजगीत म्हणतात. त्यामुळे चमचा युग काय करू शकते २०१२ च्या नंतरच्या २०१४, २०१९ निवडणुकीतील मतदार संघातील आकडेवारी आणि टक्केवारी बहुजन समाजाला दाखवून दिले. मान्यवर कांशीराम यांच्या वेळी देशातील तीन चार नंबरचा राष्ट्रीय पक्ष आज कोणत्या नंबर वर आहे. त्याचे आत्मचिंतन परीक्षण समीक्षा बहुजन समाजातील बुद्धिजीवी, विचारवंत साहित्यिक यांनी बहुजन समाजाच्या हितासाठी केली पाहिजे. ती होतांना दिसते काय ?.

मुझे पढे लिखे लोगोने धोका दिया असे.डॉ बाबासाहेब आंबेडकर खेदाने मत व्यक्त केले होते.पण त्याच पढे लिखे लोकांना संघटीत करून मान्यवर कांशीरामजी यांनी बामसेफ संघटना बनविली आणि त्याच्या कडून सक्तीने आर्थिक मदत मिळविली त्यातूनच त्यांनी डीएस फोर DS4 दलित शोषित समाज संघर्ष समिती द्वारे समाजात जनजागृती केली. त्याची सुरुवात ही सायकलवरून झाली. ते कार्यकर्त्यानां सांगत सायकल ही माझ्या साठी एकमात्र साधन आहे. ते केवळ साधनच नाही तर बहुजन मिशनचे सर्वात महत्वाचे साधन आहे.यावरच त्यांनी भारत भर सायकल यात्रा काढली. आज कार्यकर्त्यांच्या नेत्यांच्या घरी दोन, तीन, चारचाकी गाड्या आहेत तरी तालुका, जिल्हाभर फिरण्याची तयारी नाही. मान्यवर कांशीराम जी यांनी आपल्या पन्नास वर्षात बहुजन समाजात जनजागृतीसाठी चाळीस दिवसात चार हजार किलोमीटर सायकलवरून यात्रा केली. देशातील नव्हे तर जगातील कोणत्याही समाज सुधारक, राजकिय नेत्याने असे धाडस केले नाही.यात्रा काढणारे खूप आहेत पण त्यांच्या हजार किलोमीटर वर भूमिका बदलत राहतात.त्यामुळे त्यांचा इवेंट होतो प्रबोधन होऊन परिवर्तन होतांना दिसत नाही.

मान्यवर कांशीरामजी ने रात्र दिवस मेहनत करून वाढविलेली बसपा मायावतीने चमच्या लोकांच्या सल्ल्याने देश भरातील प्रथम कॅडर बेस कार्यकर्ते संपवले. मायावतीचे सर्व निर्णय अचूक असतील तर प्रत्येक राज्यात पक्ष संघटन का वाढत नाही यांची समीक्षा बैठक प्रामाणिकपणे झाली पाहिजे. कांशीरामजीने मायावतीवर जो विश्वास दाखविला त्याला तडा गेला आहे. मिशनरी कार्यकर्त्यांना चमचा समजून पक्षातून बेदखल करून बसपाचे न भरून येणारे नुकसान झाले आहे. काही चमच्यांना त्याच्या समाजाच्या विरोधात उभे केले जाते.तर मिशनरी कार्यकर्त्यांना त्यांच्या समाजाच्या हिता साठी उभे केले जाते. चमचा आपल्यासमाजाच्या नेत्याला कमजोर बनवितो तर मिशनरी कार्यकर्ता आपल्या समाजातील सच्च्या नेत्याला मजबूत बनवितो. कांशीरामजीची संघटन कौशल्य आणि मायावतीचे संघटन कौशल्य यातील फरक आज प्रत्येक राज्यात दिसून येत आहे. गरीब प्रामाणिक, वक्तृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्व करणाऱ्या कार्यकर्त्यांची आज पक्षाला गरज नाही. त्यामुळे तो बाहेर फेकल्या गेला आहे.काही कार्यकर्ते नोकरी धंदा करायला लागले. तर काही वैफल्यग्रस्त झाले आहेत.

महाराष्ट्र राज्याचा विचार केला तर लक्ष्मीपुत्र विलास गरुड यांनी एका ही तालुक्यात, जिल्ह्यात नेतृत्व निर्माण होऊ दिले नाही. एकाही विधानसभा, लोकसभा मतदारसंघात उमेदवार हक्क सांगेल असा नेता निर्माण होऊ दिला नाही. मुलगा तरुण झाला. सुशिक्षित झाला म्हणून आईवडीलानां घराच्या बाहेर काढत नाही, वेळोवेळी त्यांचा मानसन्मान ठेऊन सल्ला घेतच असतो. पक्षात माजी अध्यक्ष झाला तर नवीन अध्यक्षांनी त्याला सोबत ठेऊ नये त्याला कोणत्याही कार्यात सहभागी होऊ देऊ नये, ही पद्धत आज खुद्द गरुड बाबत वापरली जात आहे. म्हणजे निसर्गाचा नियम आहे, जे पेरले तेच उगवते. जे विचारधारा मानणारे कॅडर बेस कार्यकर्ते असतात ते कोणत्याही परिस्थितीत दुसऱ्या पक्षात जाऊ शकत नाही आणि गेले तर जास्त दिवस टिकू शकत नाही.एक वेळ पक्ष बदलला तर त्यांना समाजात काम करता येत नाही. मग ते सामाजिक, धार्मिक शैक्षणिक सांस्कृतिक कार्या कडे वळतात. तिथे ही त्यांना सारखा वैचारिक संघर्ष करावा लागतो. बहुजनांच्या म्हणजे मागासवर्गीय, ओबीसी, आदिवासी आणि अल्पसंख्याक समाजाच्या कोणत्याही मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पक्ष व पक्षांचे कार्यकर्ते जनांदोलन करून न्याय मिळवून देण्यासाठी काम करत नसतील तर त्यांना निवडणूकीत मतदान मागण्याचा काय अधिकार आहे.

महापुरुषांच्या नांवावर मत मागायचे तर त्यांनी ज्या असंघटित कष्टकरी मागासवर्गीय, ओबीसी, आदिवासी आणि अल्पसंख्याक समाजाला सहा मूलभूत अधिकार मिळवून दिले अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, रोजगार आणि आरोग्य त्याबाबत पक्षाच्या वतीने कोणतेच काम होत नाही. राज्य व केंद्रांच्या अनेक योजना या बहुजन समाजाला मिळत नाहीत. उच्चवर्णीय सरकारी अधिकारी आणि उच्चवर्णीय शासन मान्यता असलेले ठेकेदार बहुजन समाजाचे मुक्त शोषण करतांना दिसतात.त्यातही राजकीय चमच्याची रोजीरोटी यांचे आर्थिक शोषण करूनच चालते. त्यावर महापुरुषांच्या विचारांचा वारसा सांगणारा पक्ष कोणत्या ही ठोस कृती कार्यक्रम राबवीत नाही. बहुजनांनी म्हणजे मागासवर्गीय, ओबीसी, आदिवासी आणि अल्पसंख्याक समाजानी बसपाचा मतदार का राहावा आणि बसपाला मतदान का करावे?. यांचे अभ्यासपूर्ण आत्मचिंतन झाले पाहिजे. मान्यवर कांशीराम यांनी जागी केलेली कोम (बहुजन समाज) पुन्हा पुन्हा दिशाहीन होऊन का झोपतो. त्याची चिकित्सा झाली पाहिजे. त्यासाठी कांशी तेरी नेक कमाई तुने सोती कोम जगाई या घोषणाचा मान्यवर कांशीराम यांच्या ९० व्या जयंती दिनी बहुजन समाजाला विसरता येणार नाही. मान्यवर कांशीराम यांच्या क्रांतिकारी विचारांना व प्रतिमेला त्रिवार वंदन आणि बहुजन समाजास जयंतीनिमित्त हार्दिक शुभेच्छा.

**– सागर रामभाऊ तायडे**

## मराठवाड्यातील जेष्ठ नागरिकांचा विभागीय मेळावा १७ मार्च रोजी जालन्यात





वैजापूर, दि. १४ (प्रतिनिधी) - महाराष्ट्र राज्यात एक कोटी पेक्षा अधिकची संख्या जेष्ठ नागरिकांची आहे. या जेष्ठ नागरिकांना कुटुंब, समाज व विविध शासकीय कार्यालयात सन्मानाची वागणूक मिळावी. शासनाने निराधार जेष्ठ नागरिकांना शासकीय संरक्षण द्यावे, त्यांची समाजात होणारी हेळसांड थांबावी, त्यांची वेळोवेळी आरोग्य तपासणी शासनाच्या आरोग्य खात्यामार्फत व्हावी इत्यादी विविध मागण्या या जेष्ठ नागरिकांच्या आहेत, त्यावर मार्ग निघावा व समाजाची जेष्ठ मंडळी जी अनमोल ठेवा आहे, त्याचे संरक्षण व्हावे अशा विविध मागण्यांसाठी जालना येथे जेष्ठ नागरिकांचा विभागीय महा मेळावा येत्या रविवार रोजी(१७, मार्च)रोजी आयोजित करण्यात आलेला आहे.

या मेळाव्याचे उदघाटन राज्य जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अरुण रोडे यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी मराठवाडा जेष्ठ नागरिक संघ (उत्तर मराठवाडा फेस्कॉम) अध्यक्ष अशोक तेरकर राहणार आहे, या महा मेळाव्यासाठी राज्यातील व मराठवाडा विभागातील जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मराठवाडा विभागीय जेष्ठ नागरिक संघ सरचिटणीस जयवंत सोमवाड, उपाध्यक्ष श्री पत्की, संपर्क सचिव धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले आहे. प्रमुख वक्ते विभागीय अध्यक्ष पुणे चंद्रकांत महामुनी मार्गदर्शन करणार आहेत,या साठी जालना जेष्ठ नागरिक संघ चे अध्यक्ष तुळशीराम पाटील, कार्याध्यक्ष रावसाहेब ढवळे, तसेच पदाधिकारी सर्वश्री धर्मा खिल्लारे, अंकुश राऊत, राजकुमार बुलबुल, काकासाहेब खरात, के.बी. मिसाळ, ज्ञानदेव पायगव्हाणे, आर.आर. खडके, हा मेळावा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत. सदरील मेळावा जिंदल मार्केट नवा जालना येथे येत्या रविवारी सकाळी १० ते सायंकाळी४ वाजेपर्यंत आहे.

## राज्यस्तरीय तेली समाज वधू वर संपर्क मेळाव्यास प्रचंड प्रतिसाद




छत्रपती संभाजीनगर, दि. १४ (प्रतिनिधी) - सकल तेली समाज व तेली सेनेच्या वतीनेङ छत्रपती संभाजीनगर येथील यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये राज्यस्तरीय तेली समाज वधू वर संपर्क मेळावा नुकताच पार पडला.

राज्यभरातून विवाह इच्छुक वधू वर मोठ्या प्रमाणात आले होते. सदरिल मेळाव्यात ३७५ तरुण तरुणींनी नाव नोंदणी केली होती. या सर्व तरुण तरुणींनी आपला जोडीदार कसा हवा अशा अपेक्षा व मनोगत व्यक्त केले या आधुनिक पद्धतीच्या मेळाव्याची चर्चा सर्वत्र होत आहे. या मेळाव्या संदर्भात संयोजक गणेश पवार यांनी सांगितले की हा मेळावा आधुनिक पद्धतीचा नव्या विचारांचा आणि दिशादर्शक ठरलेला आहे. अनिष्ठ रूढी, प्रथा परंपरा यांना थारा देण्याऐवजी आम्ही हा मेळावा आयोजित करतांना आधुनिक विचारसरणीवर भर दिला आहे.

या मेळाव्यामध्ये तरूण तरूणींनी आपले विचार धाडसपणाने मांडले या मेळाव्यात प्रत्येक तरुण-तरुणींना बोलण्याची संधी देण्यात आली होती? या ङमेळाव्याचे उद्घाटन उपस्थित समाज बांधवांच्याच उपस्थिती मध्ये पार पाडले.

कार्यक्रम वेळेतच सुरू करून जास्त जास्त वधू वरांचा परिचय संपर्क करून देण्यात आला.

या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे गृहनिर्माण व ओबीसी मंत्री अतुल सावेङ यांच्या विशेष सहकार्याने व भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य अनिल मकरिये, तेली समाजाचे नेते कचरू वेळंजकर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ.कल्याण काळे, रविंद्र काळे, ह.भ.प.प्रभाकर बोरसे महाराज, ह.भ.प. संगिता काजाळे, समाज सेवक एकनाथ पेंढारे, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे विभागीय निरीक्षक संजय आंबेकर आम्ही तेली जय संताजी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानेशप्रसादङ आदींच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयोजक श्रीराम कोरडे, गणेश वाडेकर, सुनिल क्षीरसागर सुभाष वाळके, लक्षम राऊत, दत्त भोलाने, कूष्णा सोनवणे, अर्चना फिरके, रंजना बागूल?, गायत्री चौधरी, विशाल खर्गे, अशा राऊत समीक्षा बागुल, साक्षी पवार आदींनी परिश्रम घेतले. प्रस्तावित कूष्णा सोनवणे परतूर यांनी केले. तर सुत्रसंचलन ङलंका भवर, धनश्री आंबेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन संजय आंबेकरङ यांनी केले. तसेच भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष श्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुभ संदेश पत्र पाठवून शुभेच्छा दिल्या तसेच केंद्रीय रेल्वेमंत्री राज्यमंत्री श्री रावसाहेब दानवे दादा यांनीही दुरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या.

## 'चला मतदान करू या-उज्वल भविष्य घडवू' या; पालिका कार्यालयात महिलांचा संकल्प



वैजापूर, दि. १४ (प्रतिनिधी) - 'चला मतदान करू या--उज्वल भविष्य घडवू या' असा संकल्प करीत शहरातील महिलांनी आपल्या सोबत ईतर महिलां मतदार यांनाही मतदान जन जागृती करण्यात पुढाकार घेऊन मतदान करून घेण्यासाठी संकल्प सोडला. बुधवार(ता.१३)) रोजी पालिकेच्या सोनचिरैया उपजीविका केंद्रात हा संकल्प स्वच्छतादूत तथा सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांच्या उपस्थितीत केला प्रथम शिक्षणच्या अग्रदूत सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. श्री. राजपूत यानी कार्यक्रमात मतदान जन जागृतीसाठी उपस्थित महिलांना निवडणूकित मतदान करण्याबाबत मार्गदर्शन केले. महिलांची मतदान प्रक्रियेत कमी टक्केवारी असते या प्रित्यर्थ राजपूत यांनी महिला दिनानिमित्त आयोजित महिला मेळाव्यात महिला मतदान जागृती कार्यक्रम पालीकेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक भागवत बिघोत( राजपूत) यांच्या मार्गदर्शनाखाली आरंभ केला आहे. या प्रसंगी व्यवस्थापिका सुर्यकांता काकडे, समूह संघटक दिवाकर त्रिभुवन, सहाय्यक प्रकल्प अधिकारी सुनील भाग्यवंत, लेखापालअमीर पठाण तसेच महिला प्रवर्तक सुनीता गायकवाड, मनीषा राजपूत, अनिता म्हस्के,आशा वाघचौरे, कुसुम होंड, आशा होंड, रेखा म्हस्के, धर्मशीला सुरडकर, सुरेखा टिळेकर यांच्या सह महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या,शेवटी सुर्यकांता काकडे यांनी आभार मानले.

## 'सुराज्य अभियाना'ला यश : बेकायदेशीर प्रवासी ॲप बंद करण्याची परिवहन विभागाची सूचना !

### कोट्यवधी प्रवाशांची लुट करणाऱ्या प्रवासी ॲपवर आर्थिक दंडासह फौजदारी गुन्हे दाखल करा ! - 'सुराज्य अभियाना'ची मागणी

**प्रवासी** वाहतूकीचा व्यवसाय करण्यासाठी केंद्र सरकारकडून अनुमती न घेता बेकायदेशीर ॲग्रीगेटरचा व्यवसाय करणाऱ्या 'मेक माय ट्रीप', 'रेड बस', 'गोआयबिबो', 'सवारी', 'इन ड्राईव्ह', 'रॅपीडो', 'क्वीक राईड', 'रॅपीडो' अशा एकूण १८ खाजगी प्रवासी ॲप बंद करण्याची सूचना पुणे येथील प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी ६ मार्च २०२४ या दिवशी महाराष्ट्र सरकारकडे केली आहे. या संदर्भात हिंदु जनजागृती समितीच्या 'सुराज्य अभियाना'च्या वतीने गेली ४ वर्षे वारंवार पाठपुरावा करून प्रवाशांची लूट करणाऱ्या या प्रवासी ॲप, तसेच ट्रॅव्हल्स कंपन्यांवर कारवाईसाठी अनेक आंदोलने केली, तक्रारी केल्या; त्यानंतर केवळ ॲप बंद करण्याची सूचना करण्यात आली आहे. कोट्यवधी प्रवाशांची लुट करणाऱ्या या बेकायदेशीर ॲग्रीगेटर ॲप वरील ही कारवाई पुरेशी नाही. या कंपन्यांच्या प्रचंड लुटमारीचे विशेष लेखापरिक्षण करावे, या कंपन्यांना मोठा आर्थिक दंड ठोठवावा आणि त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीच्या 'सुराज्य अभियाना'चे समन्वयक श्री. अभिषेक मुरुकटे यांनी केंद्र आणि राज्य सरकारकडे केली आहे.

**सीबीआय, तसेच अंमलबजावणी संचालनालय (ईडी) यांच्याकडून सखोल चौकशी करावी !**

'मोटार वाहन कायदा १९८८' मधील कलम ९३(१) मधील तरतूदीनुसार ॲप आणि वेबसाईट यांवरून प्रवासी वाहतूकीचा व्यवसाय करण्याकरता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अधीन राहून सक्षम प्राधिकरणाकडून परवाना घेणे आवश्यक आहे; मात्र तसे न करता वर्षानुवर्षे हा बेकायदेशीर व्यवसाय चालू आहे. पुणे जिल्ह्याच्या प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी राज्य परिवहन आयुक्त आणि राज्याच्या सायबर सेलचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांना पत्र लिहून हे १८ ॲप बंद करण्याची सूचना केली आहे. मुळात या ॲग्रीगेटर ॲप्सनी केवळ महाराष्ट्रात नव्हे, तर संपूर्ण देशभरात फसवणूक केली आहे. त्यामुळे यांच्यावर देशभरात कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. तसेच आतापर्यंत बेकायदेशीरपणे किती रुपये गोळा केले? यामध्ये आणखी कोण सहभागी आहेत? हा 'महादेव बेटिंग ॲप'प्रमाणे मोठा घोटाळा आहे का? या सर्व प्रकरणाची सीबीआय, तसेच अंमलबजावणी संचालनालय (ईडी) यांच्याकडून सखोल चौकशी करावी, अशी मागणीही श्री. मुरुकटे यांनी केली आहे.

**टॅक्सी ॲग्रीगेटर ॲपवर कारवाई झाली; 'ऑनलाइन' बस तिकीट बुकींग ॲपवर कारवाई केव्हा करणार?**

ही कारवाई केवळ टॅक्सी ॲग्रीगेटर ॲपवर झाली आहे. अशाच प्रकारे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची 'रेडबस' ॲपसह अन्य दोन ऑनलाईन ॲपने फसवणूक केल्याचे उघडकीस आल्याने महामंडळाने त्यांच्या समवेतचा करार रद्द केला आहे. वर्ष २०१८ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्रात शासकीय परिवहन सेवेच्या केवळ दीडपट भाडे आकारण्याची अनुमती असतांना ऑनलाईन तिकिट बुकिंग ॲपने आणि खाजगी ट्रॅव्हल्स कंपन्यांनी नियमबाह्य अधिक तिकिटदर आकारून ५ वर्षे प्रवाशांची लुटमार केली. तरी ही कारवाई ऑनलाइन बस तिकीट बुकींग करणाऱ्यांवर केव्हा होणार? प्रवाशांची होणारी आर्थिक लुट रोखण्यासाठी सुराज्य अभियानाअंतर्गत प्रादेशिक आणि उपप्रादेशिक अशा १६ परिवहन अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन तक्रार केल्या. परिवहन आयुक्तांना पुरावे सादर केले. प्रतीवर्षी सण-उत्सव, उन्हाळ्याची सुटी या कालावधीत होणारी बेकायदेशीर भाडेवाढ रोखण्यासाठी तक्रारी अन् आंदोलनांच्या माध्यमातून सातत्याने आवाज उठवण्यात आला.

गृहमंत्री आणि मुख्यमंत्री यांच्यासह पंतप्रधान, केंद्रीय पर्यटनमंत्री, केंद्रीय परिवहनमंत्री यांच्याकडेही पुन्हा एकदा कारवाईची मागणी केली आहे, असे श्री. मुरुकटे यांनी म्हटले आहे.

## रमजान महिन्याच्या मांगल्य व पवित्रतेतून विधायक कर्माची पाया भरणी

**रमजान** महिना व रमजानचे रोजे, रमजान महिन्यातील मांगल्य व पवित्रता संपूर्ण मानव जातीला विधायक व रचनात्मक कार्याची जाणीव करून देणारी आहे,या

महिन्यात मानवतेचे सुंदर दर्शन घडते, दीन, दुबळे, गोर गरीब, दिव्यांग प्रति सामाजिक कर्तव्य सामाजिक बंधीलकीतून पार पाडण्यासाठी प्रवृत्त करणारा हा महिना आहे, रमजान महिन्यातील प्रत्येक कार्य, प्रत्येक कृती, स्वच्छ, निर्मळ, व शुभ भावनेने करण्यात येऊन सामाजिक ऋण फेडण्याचा प्रत्येक जण प्रयत्न करीत असतो, रमजान महिन्यात कष्ठाच्या कमाईतून केलेल्या दान धर्माला मोठे स्थान आहे,रमजान महिना हा या जगतातील सर्व मानव जातीला माणसांनी, माणसांशी, माणसासारखे वागावे व जगतात माणुसकी टिकावी अशी शिकवण देणारा हा महिना आहे, इफ्तार पार्टीतील स्नेह भोजन म्हणजे सामूहिक व सामाजिक एकतेचे दर्शन घडविणारा हा महिना आहे, सामुदायिक विवाह, दीन दुबळ्याना सहाय्य,गोरगरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप असे विधायक काम ही ह्या महिन्यात होतात. एकंदरीत रमजान महिना शुद्ध विचार, निर्मलमन, शुद्ध आचरण पाळण्याचा व हे विश्वाची माझे घर अशी शिकवण देऊन विधायक व रचनात्मक कार्य व्यक्तींकडून करून घेणारा महिना होय, या महिन्यात होणारे विधायक व रचनात्मक कार्ये आयुषभर होत राहावेत अशी अपेक्षा आहे,तसेच या महिन्यातील शुद्ध भावना, निकोपता, मनाची निर्मलता प्रत्येकाच्या आयुष्यभर टिकून राहो ही अपेक्षा,

**- धोंडीरामसिंह राजपूत**

## 'वन नेशन-वन इलेक्शन' संबंधी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे अहवाल सादर

### माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या समितीने तयार केला अहवाल



नवी दिल्ली, दि. १४ (प्रतिनिधी) - भारताचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील 'वन नेशन-वन इलेक्शन' या विषयावरील उच्चस्तरीय समितीने भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांची राष्ट्रपती भवनात भेट घेतली आणि आपला अहवाल सादर केला. हा अहवाल एकूण १८,६२६ पानांचा आहे. हा अहवाल २ सप्टेंबर २०२३ रोजी त्याच्या निर्मितीवर तज्ञांशी चर्चा करून आणि १९१ दिवसांच्या संशोधनानंतर सादर करण्यात आला आहे.

या अहवालात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची माहिती देण्यात आली आहे.

दुसऱ्या टप्प्यात, लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या निवडणुकांच्या १०० दिवसांच्या आत नगरपालिका आणि पंचायतींच्या निवडणुका व्हाव्यात अशा प्रकारे नगरपालिका आणि पंचायती लोकसभा आणि राज्य विधानसभांशी जोडल्या जातील, असे सांगण्यात आले आहे.

**सुमारे सहा महिन्यांपूर्वी हे काम देण्यात आले होते**

'वन नेशन-वन इलेक्शन' या विषयावरील कोविंद समिती देशात एकाचवेळी निवडणुका घेण्यासाठी घटनेच्या शेवटच्या पाच कलमांमध्ये दुरुस्तीची शिफारस करू शकते.

प्रस्तावित अहवाल लोकसभा, राज्य विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आयोजित करण्यासाठी एकाच मतदार यादीवर लक्ष केंद्रित करेल. गेल्या सप्टेंबरमध्ये स्थापन करण्यात आलेल्या समितीला विद्यमान घटनात्मक चौकट लक्षात घेऊन लोकसभा, विधानसभा, नगरपालिका आणि पंचायतींच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याच्या शक्यता तपासण्याचे आणि शिफारशी करण्याचे काम सोपवण्यात आले आहे.

## शासनाने तेली समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे - गणेश पवार



छत्रपती संभाजीनगर, दि. १४ (प्रतिनिधी) - तेली समाज हा कष्टकरी व स्वाभिमानी समाज आहे या समाजाचे अनेक प्रश्न शासन दरबारी प्रलंबित असून ते सोडून घेण्यासाठी सर्वांनी संघटित होणे गरजेचे आहे.

तेली सेनेच्या वर्धापन दिनानिमित्त तिळवण तेली समाज भवन किराणा चावडी शहागंज येथे तेली समाज संघटन मेळावा व तेली नारी शक्ती स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना गणेश पवार म्हणाले, की शासनाने तेली समाजाच्या मागण्यांकडे लक्ष देऊन समाजाला न्याय द्यावा तेली समाज हा महाराष्ट्र मध्ये मोठ्या प्रमाणात विखुरलेला आहे या समाजातील ८० टक्के समाज बांधव मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह करीत आहे.

तेली समाजासाठी स्वतंत्रपणेआर्थिक विकास मंडळ स्थापन करणे गरजेचे आहे. तेली सेनेची स्थापनाच सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी झाला आहे.

तेली सेनेच्या माध्यमातून आम्ही समाजाच्या प्रश्नांवर लढत राहू, असेही तेली सेनेचे संस्थापक अध्यक्ष गणेश पवार म्हणाले.

सदरील कार्यक्रमात ह.भ.प. देविदास महाराज संचालीत संतश्री जगनाडे महाराज अनाथालयातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले व तेली सेनेच्या वतीने सातत्याने वर्षभर अनेक सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. आप आपल्या माध्यमातून सामाजिक कार्याला मदत करणाऱ्या समाज बांधवांना शक्ती केंद्र प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले? तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते अनेक पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्रही देण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात संतश्री जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली.

ह.भ.प. प्रभाकर बोरसे, ह.भ.प. देविदास मिसाळ, ह.भ.प. सोमनाथ कर्डिले, ह.भ.प. संगिता काजळे, तिळवण तेली समाज भवनचे अध्यक्ष रमेश क्षीरसागर, समाज सेवक श्री. नारायण दळवे, लक्ष्मी महाकाळ, नम्रता? देवे, डॉ मीनल क्षीरसागर यांनी उपस्थित समाजाला मार्गदर्शन केले.

प्रमुख उपस्थित म्हणून जेष्ठ पत्रकार स.सो. खंडळकर, महेंद्र महाकाळ, रत्न दळवे, नारायण दळवे, ज्ञानेश्वर सोनवणे, भगवान राऊत, रामेश्वर मालोदे, योगेश मिसाळ, जगदीश नांदरकर, राजेंद्र होळीवाळे, दत्त राऊत, सुनिता सोनवणे, शरदा तेली, अंजली मिसाळ, सुनंदा अबोले, जयश्री कोरडे,आदींची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तेली सेनेचे संस्थापक अध्यक्ष गणेश पवार यांनी केले तर सुत्रसंचालन सौ.धनश्री आंबेकर यांनी केले व आभार प्रदर्शन जिल्हा अध्यक्ष श्रीराम कोरडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेश शिंदे, भगवान मिटकर, सुनिल क्षीरसागर, गणेश वाडेकर, श्रीराम कोरडे, दत्त भोलाने, राजू मगर, संतोष गायकवाड, भिकन राऊत, संतोष सुरूळे, योगेश शेलार, गजानन लुटे,गायत्री चौधरी, अर्चना फिरके, रंजना बागूल, ज्योती पतवे, सुनिता पवार,साक्षी पवार, आदींनी परिश्रम घेतले.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# छत्रपती संभाजीनगर पश्चिम आणि मध्य मतदारसंघाचा आढावा

## निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पारदर्शक व निष्पक्ष निवडणूक प्रक्रिया राबवा-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



छत्रपती संभाजीनगर दि.१४ (प्रतिनिधी)- सर्व निवडणूक कर्मचाऱ्यांनी निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे नेमून दिलेल्या मतदार संघात जबाबदारी पार पडावी व पारदर्शक व निष्पक्ष निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात आज औरंगाबाद १०८ पश्चिम मतदारसंघातील नोडल अधिकारी, क्षेत्रीय अधिकारी, मतदान प्रक्रियेतील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण व आढावा बैठक घेण्यात आली. औरंगाबाद १०८ पश्चिम मतदार संघाच्या सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना खेतमाळीस, शासकीय महाविद्यालयाचे प्राचार्य डंभारे यांच्यासह पोलीस निरीक्षक प्रवीना यादव तसेच सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, लोकशाही बळकट करण्याची जबाबदारी आपली सर्वांची आहे. कर्तव्य म्हणून मतदानाची प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सर्व जबाबदाऱ्या पार पाडाव्यात. मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी स्वीप अंतर्गत वेगवेगळ्या उपक्रमातून जनजागृती करुन मतदानासाठी मतदारांचा सहभाग जास्तीत जास्त व्हावा यासाठी प्रयत्न व्हावे. मतदान केंद्रावर सर्व सुविधा मतदाराला उपलब्ध करून देण्यात याव्यात. मतदान केंद्रांवर वैद्यकीय सुविधा,शेड, पिण्याच्या पाण्याची सुविधा, दिव्यांग मतदारांसाठी तसेच अन्य मतदारांसाठीही मतदार सहायता कक्ष स्थापन करण्यात यावा. महसूल, जिल्हा परिषद, महानगरपालिका, पोलीस प्रशासनाच्या समन्वयाने निवडणुकीची प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडावी असे जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन सभागृहात औरंगाबाद पूर्व मतदार संघाचा आढावा घेण्यात आला. अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, निवडणूक निर्णय अधिकारी चेतन गिरासे, उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे, तहसीलदार मुनलोड यांच्यासह सर्व नोडल अधिकारी उपस्थित होते.

# हिमरु शाल निर्मिती प्रशिक्षणाचे उद्घाटन



छत्रपती संभाजीनगर दि.१४ (प्रतिनिधी)- जिल्हा नियोजन समितीच्या नाविन्यपूर्ण योजनेतून हिमरु शाल निर्मितीचे महिलांसाठी प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यकारी संचालक तथा उद्योग सहसंचालक बी.टी. यशवंते, विभागीय अधिकारी डी.यु. थावरे, एमसीईडी, प्रकल्प अधिकारी भारती सोसे, विनोद तुपे, प्रतिभा निमकर आदी यावेळी उपस्थित होते. निवासी व तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण महिलांनी लाभ घ्यावा. छत्रपती संभाजीनगरची ओळख असलेल्या हिमरू शालला पुनर्जीवित करण्याच्या उद्देशाने प्रशिक्षित होवून यशस्वी उद्योजक व्हावे. त्यासाठी शासनाकडून देण्यात आलेले अर्थसहाय सत्कारणी लागेल असे वायाळ यांनी सांगितले. बी.टी.यशवंते यांनी महिलांना कर्ज विषयक योजनांची माहिती दिली. सूत्रसंचालन जिल्हा प्रकल्प समन्वयक प्रतिभा निमकर यांनी तर विनोद तुपे प्रकल्प अधिकारी यांनी आभार प्रदर्शन केले. अमित लोंढे व जुहिता मकवाना यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

# छत्रपती संभाजीनगर लोकसभेची जागा आमचीच-प्रकाश आंबेडकर

छत्रपती संभाजीनगर दि.१४ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर लोकसभेची जागा मागच्या वेळी आम्ही जिंकली होती. आम्ही हि जागा सोडणार नाही. आमचा उमेदवार गुलदस्त्यात आहे, असे विधान वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी करताच राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण झालं आहे. काही दिवसांपूर्वी इम्तियाज जलील यांनीही सांगितले होते. मोदींना रोखण्यासाठी वंचित सोबत युतीसाठी बोलणी होऊ शकते, यामुळे वंचितचे उमेदवार इम्तियाज जलील पण होऊ शकतात. यामध्ये आश्चर्य वाटायला नको, कारण मागच्या निवडणुकीत वंचित सोबत युतीमुळे ते जिंकले होते. म्हणून आंबेडकर यांनी सांगितले हि जागा आम्ही सोडणार नाही असा इशारा दिला आहे. यावेळी राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

गुंठेवारी विभाग

२३३३५३६-४०,२३४८००१-०५
P.B.X. २३३१२८१, २३३१२८३
Fax : (०२४०) - २३३१२१३

जा.क्र./मनपा/गुंठे/कक्ष/१२२४/२०२४ दिनांक १४/३/२०२४

## जाहीर प्रगटन

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत वसाहतीमधील मिळकतधारकांना सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २००१ (सुधारणा) २०२१ दिनांक १२/०३/२०२१ रोजीच्या राजपत्रान्वये अंमलात आला. सदर अधिनियमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रशासनाने प्रस्ताव क्रमांक १८१/२०२१, दिनांक ०६/०८/२०२१ ने गुंठेवारी विकास नियमितीकरणासाठी विकास शुल्काचे दर निश्चित केले. नजीकच्या काळात २००.०० चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडासाठी विकास शुल्कात ५०% सुट देण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते माजी नगरसेवक, लोकप्रतिनिधी व नागरीकांकडुन सातत्याने होत असल्याने, विकास शुल्कात सवलत देण्याची बाब प्रशासनाच्या विचाराधिन होती. विकास शुल्कात ५०% सुट देण्याची मागणी तसेच मिळकतधारकांची आर्थिक स्थिती लक्षात घेता नागरीकांना गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रस्ताव दाखल करणे सोयीचे व्हावे, यासाठी महानगरपालिका प्रशासनाने ५५.७६ चौ.मी. ते २००.०० चौ.मी. पर्यंतच्या भूखंडासाठी प्रचलित शुल्क आकारणीत विकास खर्चात (Betterment Charges) या आर्थिक वर्षात दिनांक ३१/०३/२०२४ रोजी पर्यंत व पुढील आर्थिक वर्षात दिनांक ३०/०६/२०२४ रोजी पर्यंत ५०% सवलत देण्यात येत आहे. सदर रक्कम मिळकतधारकांना जमा करणे सोयीचे व्हावे, यासाठी दोन समान हप्त्यात रक्कम जमा करण्याची सवलत देण्यात आली आहे. विकास खर्चात Betterment Charges मध्ये ५०% सवलत या आर्थिक वर्षात दिनांक ३१/०३/२०२४ रोजी पर्यंत व पुढील आर्थिक वर्षात दिनांक ३०/०९/२०२४ रोजी पर्यंत राहिल. तसेच विकास खर्चाची रक्कम दोन हप्त्यात जमा करण्याची सवलत ही दिनांक १५/०३/२०२४ ते दिनांक ३०/०६/२०२४ या मर्यादित कालावधीसाठीच राहील. अर्जदाराने प्रस्ताव सादर करताना पहिला हप्ता जमा करुन दिनांक ३०/०६/२०२४ पुर्वीचा दुसऱ्या हप्त्याचा आगाऊ धनादेश (Post Dated Cheque) सादर करणे बंधनकारक राहील, त्याशिवाय प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.

तसेच गुंठेवारी विकास नियमितीकरणाचे काम जलदगतीने होण्यासाठी व गुंठेवारी वसाहतीमधील मिळकतधारकांना परिपूर्ण प्रस्ताव सादर करणे सोयीचे व्हावे, यासाठी महानगरपालिकेच्या नगर रचना विभागाकडे नोंदणीकृत असलेल्या पात्रताधारक अभियंता, वास्तुविशारद, सुपरवायझर यांचे पॅनल तयार करण्यात येईल. सदर एजन्सी महानगरपालिका व नागरीकांच्यामध्ये दुवा व समन्वयक म्हणुन काम करेल, यामुळे चुकीचे किंवा अपुर्ण प्रस्ताव सादर केले जाणार नाहीत. सदर अर्जदारास एजन्सीकडून प्रस्ताव तयार करण्याचे मोबदला शुल्क खालीलप्रमाणे निश्चित करुन देण्यात आले आहेत.

| अ.क्र. | प्रस्तावाचा प्रकार | प्रस्ताव तयार करण्याचे शुल्क |
|---|---|---|
| १ | २०'x' ३०० (५५.७६ चौ.मी.) पर्यंतच्या क्षेत्राचा खुल्या भूखंडाचा प्रस्ताव तयार करणे. | ५०००/- |
| २ | ५५.७६ चौ.मी. पर्यंतच्या क्षेत्राचा भूखंडासहीत बांधकामाचा प्रस्ताव तयार करणे. | ५००० + २००० = ७०००/- |
| ३ | ५५.७६ चौ.मी. ते २००,०० चौ.मी. पर्यंतच्या क्षेत्राचा खुल्या भूखंडाचा प्रस्ताव तयार करणे. | ७,०००/- |
| ४ | ५५.७६ चौ.मी. ते २००.०० चौ.मी. पर्यंतच्या क्षेत्राचा भूखंडासहीत बांधकामाचा प्रस्ताव तयार करणे. | ७००० + २००० = ९०००/- |
| ५ | २००.०० चौ.मी. क्षेत्रापेक्षा जास्त भूखंड क्षेत्र असलेल्या सर्व खुल्या भूखंडाच्या प्रस्तावासाठी | १०,०००/- |
| ६ | २००,०० चौ.मी. क्षेत्रापेक्षा जास्त भूखंड क्षेत्र असलेल्या सर्व भूखंडासहीत बांधकामाचा प्रस्ताव तयार करणे. | १०००० +५००० = १५०००/- |

अर्जदारास महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या एजन्सीकडुन प्रस्ताव सादर करणे बंधनकारक राहणार नाही. तथापी पॅनलमधील एजन्सीकडुन प्रस्ताव सादर करावयाचे असल्यास, विवरण पत्रात नमुद करण्यात आल्याप्रमाणे एजन्सीस द्यावयाच्या मोबदला शुल्काची रक्कम अर्जदारास द्यावयाच्या विकास शुल्काचे चलनात स्वतंत्रपणे समाविष्ट करण्यात येईल. याखेरीज एजन्सीला अर्जदाराने वेगळी रक्कम अदा करण्याची आवश्यकता नाही. अर्जदाराचा प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर एजन्सीस महानगरपालिकेमार्फत देयक स्वरुपात आवश्यक त्या वजावटीसह देयक अदा करण्यात येईल, याबाबत महानगरपालिकेने ठराव क्रमांक १३५७/२०२४, दिनांक १३/०३/२०२४ अन्वये ठराव पारित केला आहे. सदर आदेशाची अंमलबजावणी ही दिनांक १५/०३/२०२४ पासुन अंमलात येईल.

अनधिकृत वसाहतीमधील मिळकतधारकांनी या संधीचा लाभ घ्यावा व आपले भूखंड / भूखंडासहीत बांधकाम दिनांक ३०/०९/२०२४ रोजी पर्यंत गुंठेवारी अधिनियमातंर्गत नियमाधिन करुन घ्यावेत, असे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रशासनातर्फे जाहिर आवाहन करण्यात येत आहे. तसेच जे मिळकतधारक नियमितीकरणासाठी आपले प्रस्ताव सादर करणार नाहीत, अशा मिळकतधारकांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६० अन्वये अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याची कारवाई करण्यात येईल.

**स्वाक्षरित/-**
**अतिरिक्त आयुक्त-१**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**

# प्रत्येक निवडणुकीत महिलांनी मतदान करण्याचा वैजापूरात केला संकल्प




वैजापूर दि.१५ (प्रतिनिधी)- चला मतदान करू या उज्वल भविष्य घडवू या असा संकल्प महिलांनी बुधवार (ता.१३)रोजी समाज कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांच्या समवेत जागतिक महिला दिन निमित्त आयोजित 'सन्मान नारी शक्तीचा'या कार्यक्रमात करून महिला मतदार जागृती करण्यासाठी पुढाकार घेतला, शिवसेना महिला आघाडी वैजापूर-गंगापूर यांच्या वतीने आयोजित 'सन्मान नारी शक्तीचा',या कार्यक्रमात तालुक्यातील हजाराहून अधिक महिला आल्या होत्या याचा लाभ महिला मतदार जागृती करण्यासाठी राजपूत यांनी पद्मावती लांन येथे जाऊन महिलात मतदान जागृती केली. मुख्याधिकारी तथा प्रशासक भागवत बिघोत यांच्या मार्गदर्शनाखाली राजपुत महिला वर्गात मतदान जागृती करीत आहेत, त्याना या प्रसंगी आयोजक सौ,संगीता बोरनारे,सौ, वर्षा बोरनारे,गौरी बोरनारे, अबोली बोरनारे,जया रक्ताटे, आशा कार्यकर्ती मंदाबाई निंबाळकर, माधुरी निंबाळकर,माया म्हस्के,सौ, निखाडेताई, सौ.बागुल, यांनी मोलाचे सहकार्य केले,तसेच राजेंद्र साळुंके, पारस घाटे, संजय बोरनारे, अमोल बोरनारे, भरत कदम, यांनी ही सहकार्य केले.

# जलयुक्त शिवार अभियानात सामाजिक संस्थांनी पुढाकार घ्यावा-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



छत्रपती संभाजीनगर दि.१४ (प्रतिनिधी)- जिल्ह्यात जलयुक्त शिवार २.० अभियानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवाराअंतर्गत जलसंधारणाची विविध कामे करण्यासाठी विविध सामाजिक संस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

जलयुक्त शिवार २.० बाबत आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, जलसंधारण विभागाचे उपअभियंता कोठावळे , उपजिल्हाधिकारी पुनर्वसन श्रीमती मुथा , उपजिल्हाधिकारी रोहयो अर्चना खेतमाळीस यांच्यासह प्रेरणा फाउंडेशन, मराठवाडा ग्रामीण विकास संस्था ,कैलास पाटील बहुउद्देशीय संस्था, जैन फाउंडेशन, नाथ मेडिकल फाउंडेशन या सामाजिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

जलयुक्त शिवार अंतर्गत विविध सामाजिक संस्था काम करीत आहेत. सामाजिक संस्थेने सामाजिक दायित्व भूमिका ठेवून धरणातील गाळ काढावा आणि शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावा, असे जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगीतले. जलयुक्त शिवार अंतर्गत जिल्ह्यातून ३७८ ग्रामपंचायतींनी आपले प्रस्ताव सादर केले असून यापैकी दोनशे प्रस्ताव ऑनलाइन सादर केले आहेत. यामधून ११८३ गावांमध्ये जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत जलसंधारणाची कामे करण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांमध्येही विहीर पुनर्भरण, जलपुर्भरण योजना याची माहिती आणि जाणीव जागृती करावी असे आवाहन जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले.

# मनपा आणि सिडको प्रशासकांचा पुढाकाराने २००६ पासून प्रलंबित प्रश्न सुटला



मनपा दि.१४ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत आणि मुख्य प्रशासक सिडको भाग्यश्री विसपुते यांनी २००६ पासून प्रलंबित असलेला प्रश्न आज महापालिकेत संपन्न झालेली एका बैठकीत मार्गी लावले. १९९१ मध्ये काही जागा मनपाने सिडको कडून काही जागा शाळेकरिता हस्तांतरित केल्या होत्या.

२००६ मध्ये सिडको मनपात विलीन झाली. परंतु १९९१ ते २००६ पर्यंत त्या शाळेचे भाडे मनापा यांनी द्यावे अशा ऑडिट अहवाल सिडको कार्यालयाला प्राप्त झाले. त्यामुळे महानगरपालिके कडे मालमत्ता कर आणि पाणीपट्टीचा कर सिडको कार्यालयाने थांबवला होता.

याबाबत सिडको कार्यालयाचे म्हणणे होते की महानगरपालिकेने तो प्रलंबित भाडे द्यावे अन्यथा मालमत्ता करातून अथवा पाणी पाणीपट्टीतून सदरील भाडे वरती करून घ्यावे. परंतु हा प्रश्न सहज मार्गी लागण्यासारखा होता तथा तरीही हा प्रश्न बऱ्याच वर्षापासून प्रलंबित होता. यामध्ये आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी स्वतः जातीने लक्ष घातले, वेळोवेळी सिडको प्रशासनाच्या आणि महापालिकेच्या संयुक्त बैठका यामध्ये पार पडल्या आणि अंततः असे निर्णय घेण्यात आला की दोन्ही कार्यालयाने एकमेकांना प्रलंबित असलेले देयके देऊन हा प्रश्न कायमचा मिटवावा. आज प्रशासक जी श्रीकांत आणि मुख्य प्रशासक सिडको भाग्यश्री विसपुते यांच्या उपस्थितीत मनपा आणि सिडको प्रशासनाच्या अभियंतानी मनपा कार्यालयामध्ये एकमेकांना धनादेश देऊन हा प्रश्न कायमचा निकाली काढला आहे. यामध्ये सिडको कार्यालयाने महानगरपालिकेस साधारण एक कोटी ४४ लाखाचा मालमत्ता करापोटी आणि पाणीपट्टीचा एकत्रित झोन नंबर ०५ आणि ०७ अंतर्गत असलेल्या मिळकतीकरिता रक्कम दिली आणि महानगरपालिकेने अशाच पद्धतीने एक कोटी ०६ लाखाचा धनादेश सिडको कार्यालयास प्रलंबित असलेल्या शालेय भाडापोटी दिलेला आहे.

# धोंडीराम राजपूत यांचा पालिका कार्यालयात सत्कार



वैजापूर दि.१४ (प्रतिनिधी)- येथील समाज कार्यकर्ते व जेष्ठ साहित्यीक धोंडीरामसिंह राजपूत यांना महाराष्ट्र शासनाने दोन पुरस्कार अनुक्रमे पदमश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार व डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार देऊन गौरविले त्या प्रित्यर्थ पालिका मुख्याधिकारी तथा प्रशासक भागवत बिघोत राजपूत यांनी गुरुवार (ता.१४) रोजी पालिका कार्यालयात यथोचित सत्कार करून अभिनंदन केले. या प्रसंगी सावनसिंह राजपूत, प्रकाश पाटील, शंकर जोरे, श्री. मुळे, मंगेश नाईकवाडी व अन्य कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते.

**प्रेस नोटीस**

**मृद व जलसंधारण विभाग महाराष्ट्र शासन**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग छत्रपती संभाजीनगर**
**ई-मेल पत्ता - eessiwcabad@gmail.com दुरध्वनी क्रमांक ०२४०-२३४८०१०**
**ई-निविदा कार्यप्रणाली अंतर्गत**

## ई-निविदा सुचना क्र.ब-१/४९ सन २०२३-२४ प्रसिध्द करणे बाबत

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्र शासन हे महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ छत्रपती संभाजीनगर अंतर्गत प्रशासकीय मान्यताप्राप्त योजनांचे कामाकरीता बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatender.gov.in या संकेत स्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा पुर्ण अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग छत्रपती संभाजीनगर यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर व वरील वेबसाईटवरती उपलब्ध करुन देण्यात येईल.

ई निविदा उपलब्ध कालावधी - दिनांक १५/०३/२०२४ ते दिनांक २२/०३/२०२४.
Geo-tagging कालावधी - दिनांक १६/०३/२०२४ ते दिनांक २०/०३/२०२४.
ई निविदा उघडणे - दिनांक २६/०३/२०२४.
खालील ठिकाणी ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. संकेतस्थळ - http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे. (सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
२. जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील सुचना फलकावर सविस्तर निविदा सुचना उपलब्ध आहे.
३. संकेतस्थळावर प्रसिध्द होणाऱ्या वेळापत्रकाप्रमाणे निविदा उघडण्याची तारीख व वेळेनुसार कंत्राटदाराने किंवा त्याच्या अधिकृत प्रतिनिधीने उपस्थित रहावे अन्यथा निविदा उघडल्यास कोणतीही तक्रार स्वीकारली जाणार नाही.

जा.क्र./निविदा सुचना/जि.ज.अ.वि.औ./१३१८ दिनांक- १३/०३/२०२४

**स्वाक्षरीत/-**
**(एस.एन.शिंदे)**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी,**
**मृद व जलसंधारण विभाग**
**छत्रपती संभाजीनगर**

डीजीआयपीआर/२०२३-२०२४/९९५६